जा.क्र. सकसं/शिक्षण/राशामपु/विद्यार्थीयादी/०७-०८/का४/ ९५२४
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांक : २१ जून २००७.

प्रति,
मा. अध्यक्ष,
माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ,
शिवाजी नगर, पुणे-५.

विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार
माध्यमिक परीक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून विशेष प्राविण्य
मिळविणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

संदर्भ : शासन निर्णय क्र. ईबीसी २००३/प्रक्र ११५/मावक-२, दि. ११ जून २००३

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भांकित शासन निर्णयान्वये **इयत्ता १२ वीच्या परीक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासव प्रवर्गाचे विद्यार्थी राज्यात/ विभागीय मंडळात/ जिल्हयात/तालुक्यात/शाळेत प्रथम येतील त्यांना तसेच विभागीय मंडळाच्या गुणवत्ता यादीत** आलेल्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे पुरस्कार देण्याचा निर्णय सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून शासनाने घेतला आहे. पुरस्काराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | पुरस्काराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | सर्वसाधरण विद्यार्थ्यांमधून **राज्यात प्रथम** आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस (म्हणजे जर संपूर्ण राज्यातून पहिला आलेला विद्यार्थी अनुसूचितत जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील असेल तर | रुपये २.५० लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| २ | सर्वसाधरण विद्यार्थ्यांमधून **प्रत्येक बोर्डामधून प्रथम** आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस . | रुपये १.०० लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ३ | प्रत्येक **बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये** आलेल्या प्रत्येक अनुसूचित जाती., विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांस (म्हणजे जर प्रत्येक बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी अनुसूचितत जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील असतील तर ) | रुपये ०.५० लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ४ | सर्वसाधरण विद्यार्थ्यांमधून **जिल्हयात प्रथम** आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस (म्हणजे जर जिल्हयात पहिला आलेला विद्यार्थी अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील असेल तर ) | रुपये ०.२५ लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ५ | सर्वसाधरण विद्यार्थ्यांमधून **तालुक्यात प्रथम** आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस (म्हणजे जर तालुक्यात पहिला आलेला विद्यार्थी अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील असेल तर ) | रुपये ०.१० लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ६ | सर्वसाधरण विद्यार्थ्यांमधून **शाळेमध्ये प्रथम** आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस (म्हणजे जर शाळेत पहिला आलेला विद्यार्थी अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील असेल तर ) | रुपये ०.०५ लाख रोख स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |

आपणास विनंती करण्यात येते की, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उच्चमाध्यमिक (इ. १२ वी ) परीक्षेचा निकाल दिनांक ८ जून २००७ रोजी लागलेला आहे. सबब खाली दर्शविलेल्या विवरणपत्रात या

संचालनालयास माहिती पाठवावी तसेच प्रत्येक बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची यादी असलेली पुस्तिका पाठविण्यात यावी ,अशी विनंती आहे.

| परीक्षेचे नांव | अ. क्र | विद्यार्थ्यांचे नांव | शाळेचे नांव | बैठक क्रमांक | जातीचा सांकेतांक | कोणत्या स्तरावर प्रथम आला | | | | | एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | राज्य | बोर्ड | जिल्हा | तालुका | शाळा | | |
| उच्चमाध्यमिक शालांत परीक्षा (इ. १२ वी) | १ | | | | | | | | | | | |
| | २ | | | | | | | | | | | |
| | ३ | | | | | | | | | | | |
| | ४ | | | | | | | | | | | |

आपला विश्वासू,

**संचालक, समाज कल्याण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.**

प्रत विभागीय समाज कल्याण अधिकारी, (सर्व) यांना माहिती व त्वरीतच्या कार्यवाहीस्तव रवाना.

आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातून इयत्ता १२ वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्याने जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत त्याची माहिती उपरोक्त नमून्यात संबंधित उच्चमाध्यमिक परीक्षा मंडळाकडून प्राप्त करुन घेऊन त्याची एक प्रत या संचालनालयास त्वरीत सादर करावी.

**संचालक, समाज कल्याण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.**